महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहिर सुचना

अधीक्षक अभियंता महावितरण मंडळ कार्यालय कन्हैय्यानगर, देऊळगाव राजा रोड जालना या आस्थापनेवर सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, जालना यांच्या सर्वेक्षण अहवालानुसार सन २०२४ करीता प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवारांच्या विजतंत्री ६७, तारतंत्री ६६ एकूण १३३ जागा भरण्यासाठी विजतंत्री तारतंत्री या व्यवसायात आय.टी.आय. उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक १३.०३.२०२४ ते दिनांक २८.०३.२०२४ रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत **www.apprenticeship.org** या संकेतस्थळावर आस्थापना क्रमांक **E11162700703** वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दिनांक २८.०३.२०२४ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टिप :- अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक २८.०३.२०२४ रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंतची राहील. उमेदवाराने **www.apprenticeshipindia.org** या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. **सदर भरती ही फक्त जालना जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी असून इतर जिल्ह्यातील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी,** ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची सर्व संबंधीत कागदपत्रांची (शैक्षणीक प्रमाणपत्र-आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधार कार्ड, रहिवाशी दाखला ई.) साक्षांकीत छायांकीत प्रत दिनांक २८.०३.२०२४ पर्यंत महावितरण मंडळ कार्यालय कन्हैय्यानगर, देऊळगावराजा रोड जालना येथे प्रत्यक्ष सादर करावी. तसेच शैक्षणीक व इतर कागदपत्रांची साक्षांकीत छायांकीत प्रत सादर न करणाऱ्या उमेदवारांचा ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही, तसेच प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील. निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत नियमाप्रमाणे अदा करण्यात येईल. शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**अधीक्षक अभियंता,**

**म.रा.वि.वि.कं.मर्या, जालना मंडल**